# नितीन गडकरी : दुर्दम्य इच्छाशक्तीचे प्रतीक

सामाजिक व आर्थिक परिवर्तनाचे उपकरण ठरलेले व दुर्दम्य इच्छाशक्तीचे प्रतीक असलेले नितीन गडकरी आज एक वरिष्ठ मंत्री म्हणून नरेंद्र मोदी यांच्या मंत्रिमंडळात सामील झाले. ५७ वर्षीय गडकरी काँग्रेसचा बालेकिल्ला असलेल्या नागपूर लोकसभा मतदारसंघातून निवडून आले असून तब्बल सातवेळा विजयी झालेले विलास मुत्तेमवार यांचा त्यांनी जवळजवळ तीन लाखांनी पराभव केला.

त्यांच्या उत्कृष्ट देखरेखीखाली आणि कार्यक्षम मार्गदर्शनाखाली स्वातंत्र्यानंतर प्रथमच भाजपा-शिवसेना महायुतीने महाराष्ट्रातून ४८ पैकी ४२ जागांवर विजय प्राप्त केला. विदर्भातून तर युतीने सर्वच्या सर्व म्हणजे दहाही जागांवर विजयाचा झें डा रोवला.

महाराष्ट्रातील नागपूर शहरात, जे रा. स्व. संघाचे मुख्यालयही आहे, गडकरींचा मध्यमवर्गीय शेतकरी कुटुंबात जन्म झाला. नितीन गडकरींवर त्यांच्या आईचा मोठाच प्रभाव होता. त्यांनीच गडकरींना सामाजिक कार्य करण्यास प्रेरित व प्रोत्साहित केले. नि:स्वार्थपणे सामाजिक कार्य करून व  राष्ट्र उभारणीची चळवळ राबवून समाजातील सर्व घटकांच्या कल्याणाकरिता झटणाऱ्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाकडूनही त्यांना राष्ट्रकार्याची प्रेरणा मिळाली.

जून १९७५ मध्ये इंदिरा गांधी यांनी देशावर लादलेल्या आणिबाणीमुळे त्यांच्या आयुष्याने एक नवीन वळण घेतले आणि त्यांनी वकिलीचा व्यवसाय करण्याऐवजी स्वत:चे आयुष्य राष्ट्राच्या सेवेकरिता समर्पित करण्याचा निश्चय केला. गडकरी हे उच्चविद्याविभूषित एम. कॉम, एल. एल. बी. असून त्यांनी बिझनेस मॅनेजमेंट (डीबीएम) चा डिप्लोमाही केला आहे.

विद्यार्थी नेते म्हणून अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या माध्यमातून नितीन गडकरी यांनी राजकारणात प्रवेश केला आणि त्यानंतर ते भाजपाची युवक आघाडी असलेल्या भारतीय जनता युवा मोर्चात सामील झाले. स्वत:ची कारकीर्द

घडविण्यासाठी राजकारण या दृष्टीने गडकरी त्याकडे पाहात नसून सामाजिक सेवेचे साधन म्हणून ते राजकारणाकडे बघतात. या माध्यमातून पददलितांसाठी तसेच समाजातील गरीब वर्गासाठी त्यांनी विविध कल्याणकारी प्रकल्प राबविले आहेत. गडकरी १९८९ पासून महाराष्ट्र विधानपरिषदेचे सदस्य आहेत. तसेच १९९९-२००५ दरम्यान महाराष्ट्र विधानपरिषदेतील विरोधी पक्षनेते म्हणूनही त्यांनी जबाबदारी पार पाडली आहे. २००९ पासून भाजपा महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष म्हणून जबाबदारी सांभाळत असतानाच त्यांची भाजपाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी नेमणूक झाली. ते पक्षाचे सर्वात तरुण अध्यक्ष ठरले. १९९५ ते १९९९ या कालावधीत ते महाराष्ट्राचे सार्वजनिक बांधकाम मंत्री होते. या कालखंडात त्यांनी धडाक्याने विविध पायाभूत प्रकल्प राबविले. ते म्हणतात, 'केवळ ५ हजार कोटींच्या गुंतवणुकीतून ८ हजार कोटींची कामे मी पूर्णत्वास नेली'. सार्वजनिक बांधकाम मंत्री या नात्याने त्यांनी राज्यात केलेले कार्य अद्वितीय व फारच परिणामकारक ठरले. ग्रामीण भागात रस्त्यांचे जाळे विणण्यासाठी ७०० कोटींचा निधी उपलब्ध करून देण्यात गडकरी यशस्वी झाले. नंतरच्या चार वर्षांत महाराष्ट्रातील ९८ टक्के लोकसंख्या पक्क्या बारमाही रस्त्यांनी जोडली गेली. अतिशय दुर्गम व सुदूर भागातील १३,७३६ गावे व खेडी मजबूत रस्त्यांनी जोडण्यासाठी गडकरींनी विविध महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतले. विशेष म्हणजे स्वातंत्र्यानंतरही ही गावे अद्याप पक्क्या रस्त्यांनी जोडलेली नव्हती. विदर्भातील दुर्गम भागातील कुपोषणाच्या समस्येवर मात करण्यासाठी या कामांचा खूपच उपयोग झाला. आतापर्यंत तेथे रेशन, वैद्यकीय मदत किंवा शैक्षणिक सुविधाही पोहोचल्या नव्हत्या.

महाराष्ट्राचे सार्वजनिक बांधकाम मंत्री या नात्याने त्यांनी मुंबई-पुणे एक्सप्रेस हायवेची निर्मिती केली. त्यांचा या क्षेत्रातील दांडगा अनुभव पाहून तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी त्यांच्याकडे राष्ट्रीय महामार्ग विकास प्राधिकरणाचे कार्य सोपविले. वाजपेयी सरकारने त्यांची राष्ट्रीय ग्रामीण रस्ते विकास समितीच्या अध्यक्षपदी नियुक्ती केली. या विषयावर भरपूर अभ्यास केल्यानंतर व अनेक बैठकांची मालिका पार पडल्यानंतर गडकरींनी आपला

अहवाल केंद्र सरकारला सादर केला आणि या विषयावर पंतप्रधान वाजपेयींसमोर प्रभावी सादरीकरणही केले. त्यांचा अहवाल केंद्र सरकारने स्वीकारला आणि ग्रामीण भागात रस्त्यांचे जाळे विणण्याची नवीन योजना लागू केली. ६०,००० कोटी रुपयांची ही महत्त्वाकांक्षी योजना प्रधानमंत्री ग्रामसडक योजना म्हणून संपूर्ण देशात ख्यातीप्राप्त आहे. भारताला अतिशय मजबूत व समर्थ करण्याचा दृष्टिकोन बाळगणाऱ्या गडकरींचा २१ व्या शतकातील राजकारण हे प्रगती आणि विकासाचे राजकारण असेल यावर ठाम विश्वास आहे.

दर्जा आणि गुणवत्तेवर त्यांचा नेहमीच कटाक्ष असतो. जिल्ह्याचे पालकमंत्री या नात्याने त्यांनी नागपूरचा चेहरामोहरा पार बदलवून टाकला. सार्वजनिक बांधकाम मंत्री  या नात्याने त्यांनी मुंबईत असंख्य फ्लायओव्हर्स बांधले. या अफाट कामामुळे त्यांना 'फ्लायओव्हर-मॅन' या टोपण नावाने ओळखले जाऊ लागले.

मात्र, मुंबई-पुणे एक्सप्रेस हायवे हा त्यांच्या कारकिर्दीतील सर्वोत्कृष्ट बिंदू होता. गडकरी शेतकरीसुद्धा आहेत. त्यांनी पाणी व्यवस्थापन व सौरऊर्जा प्रकल्प उत्कृ ष्टपणे राबविले आणि आधुनिक तंत्रज्ञान आणि व्यवस्थापन साधनांचा कृषी क्षेत्रात उत्कृष्टपणे उपयोग करून घेतला. जैव इंधन, अपारंपरिक ऊर्जा स्रोत हे त्यांचे जिव्हाळ्याचे विषय आहेत. शेतकरी आत्महत्यांसाठी बदनाम असलेल्या नागपूर क्षेत्रात त्यांनी पाणलोट विकासाचे अनेक प्रकल्प राबवून आपल्या सामाजिक बांधिलकीचा परिचय दिला आहे.

गडकरींनी विदर्भात अनेक सामाजिक कल्याणाचे प्रकल्प हाती घेतले असून अनेक खेडेगावांना सौर ऊर्जेच्या माध्यमातून त्यांनी स्वयंपूर्ण बनविले आहे. तसेच हजारो रुग्णांवर हृदय शस्त्रक्रिया करविल्या आहेत तसेच गरजूंना सौरऊर्जेवर धावणारे रिक्षे पुरविले आहेत. नितीन गडकरींचा कांचन गडकरींशी विवाह झाला असून त्यांना निखिल व सारंग ही मुले आणि केतकी ही कन्या आहे. त्यांच्या ज्येष्ठ पुत्राचा, निखिलचा ऋतुजा पाठक हिच्याशी तर सारंगचा मधुरा रोडीशी विवाह झाला आहे.